# दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यांत आलेल्या सभेचे इतिवृत्त

दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता पंचायत समिती मासिक महाराष्ट्र भुषण आ. डॉ. तिर्थरुप श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती येथे घेण्यांत आली सदर सभेकरीता पुढीलप्रमाणे अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

| सभेची तारीख वेळ व ठिकाण | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| दिनांक ०८/०५/२०२६ रोजीची सभा सकाळी ११.३० वाजता | श्री.निलेश शांताराम घाटवळ | मा.सभापती |
| | श्रीम.अश्विनी संजय जंगम | मा.उपसभापती |
| | श्री.गणेश प्रभाकर नाक्ती | मा.सदस्य |
| | श्री.राजेंद्रकुमार खताळ | गट विकास अधिकारी |
| | श्री.एस.डी.गवळी | गटशिक्षणाधिकारी |
| | श्री.प्रदिप गायकवाड | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |
| | श्री.आशिष मुकणे | सहाय्यक अभियंता (बांधकाम) |
| | श्री.संजय शेडगे | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) |
| | श्री.वसंत दळवी | विस्तार अधिकारी (कृषि) |
| | श्री.प्रसाद माळी | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) |
| | श्री.प्रमोद हणमंत यादव | कनिष्ठ अभियंता ग्रा.पा.पू |
| | श्री.प्रसाद गणेश सन्याशी | कनिष्ठ अभियंता ग्रा.पा.पू. |
| | श्रीम.प्रार्थना चंद्रकांत भोईर | विस्तार अधिकारी (कृषि) |
| | श्रीम.अपेक्षा सुशांत भोईर | तालुका अभियान व्यवस्थापक शिक्षण |
| | श्रीम.डॉ.मेघा खवसकर | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) |
| | डॉ मृण्मयी योगेश शेटये | सहा.आयुक्त पशुसंवर्धन ता.पशु चिकीत्सालय |
| | श्रीम.डॉ.मेघा खवसकर | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) |
| | श्री.नामदेव कोंडीबा राहिदे | सहाय्यक अधिक्षक ग्रामिण रुग्णालय मुरुड |
| | श्री.अक्षय सोळंके | तालुका आरोग्य अधिकारी |
| | श्री.प्रभाकर ना.पवार | बंदर निरीक्षक राजपूरी |
| | श्री.रविद्र कौतीक सैदांणे | कृषी अधिकारी मुरुड |
| | श्रीम.ए.के.डफडे | सा.व.प.मुरुड |
| | श्रीम.दिपीका एस.पाटील | कनिष्ठ लेखाधिकारी मुरुड |
| | श्री.दिपक द.जाधव | कनिष्ठ सहा. लिपिक |

**श्री.वसंत दळवी, विस्तार अधिकारी (कृषि)** यांनी, पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभेची प्रस्तावना केली
**गटशिक्षणाधिकारी श्री.सुनिल गवळी** यांनी जवाहर नवोदय प्रवेश परिक्षा उत्तीर्ण ३ विदयार्थ्याच्या अभिनंदन ठराव घेण्यात आला

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** सर्वांनी सभेला हजर राहने बाबत सुचित केले जे हजर नाहीत त्यांना पत्र देण्याबाबत सांगितले व मागिल सभेची इतिवृत्त मंजूर केले, श्रीम.अश्विनी डोंगरीकर सदस्यचे रजेचे अर्ज बाबत चर्चा केली रजा मंजूर केली.

**विषय नं.१**- मागील सभेचे इतिवृत्त मंजुर करणे:- दिनांक ०९/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त सर्वानुमते वाचून मंजूर करण्यांत आले.

**विषय नं.२:-** महत्वाचे पत्रव्यवहार वाचणे:- महत्वाचा पत्रव्यवहार नव्हता

**विषय नं.३:-** मागील सभेमध्ये मंजूर केलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला व वार्षिक प्रशासन अहवाल सन २०२५-२६ मंजूरी साठी ठराव घेण्यात आला

**विषय नं.४:-** विकास कामांचा आढावा घेणे.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी शिक्षण विभागाचा कामकाजा विषयी विचारण्यात आले **गटशिक्षणाधिकारी श्री.सुनिल गवळी** यांनी तालुक्यातील शिक्षण विभागाबाबत माहिती सांगितले प्रथम त्यांनी मा.सभापती / उपसभापती व सदस्य यांचे कार्याचा गौरव केला तसेच मुरुड तालुक्यातील कॉलरशिप परिक्षेत ५० ते ६० विदयार्थी उत्तीर्ण झाले आहे. याबाबत सभागृहास सांगितले, जवाहर नावोदय विद्यालय प्रवेश परिक्षा साठी जिल्हयातील १५०० विदयार्थी बसले असता मुरुड तालुक्यातील ३८ पेक्षा जास्त विदयार्थी उत्तीर्ण झाले आहे. व ३ विदयार्थ्यांची निवड जवाहर नवोदय विद्यालय माणगांव येथे झाली आहे. १) कु.क्षितिज समीर म्हात्रे रा.जि.प.शाळा नांदगाव क्र.१, २) कु.आराध्या अभिजीत लाड रा.जि.प शाळा भोईघर, ३) कु.अनुश्री जयवंत देडगे, नचिकेताज हायस्कूल विहूर ता. मुरुड, या विदयार्थ्याचे मा.सभापती महोदय, यांच्या हस्ते सभे मध्ये सत्कार करण्यात आला व केंदप्रमुख श्री. म्हात्रे याचेही मा.सभापती महोदय, यांनी सत्कार केला शैक्षणिक वर्षात मुरुड तालुक्यातील इयत्ता १२ वीचा निकाल ९५% लागला असून इयत्ता १० वी चा निकाल आज रोजी आहे. इयत्ता १० वी व इ.१२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या १ ते ५ क्रमांकाच्या विदयार्थ्याचा सत्कार काही दिवसात करण्याबाबत मा. सभापती महोदय व गटविकास अधिकारी यांच्याशी चर्चा करुण सभागृहास सांगितले.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी बालविकास प्रकल्प मुरुड यांना विभागाची माहिती विचारली

**मा.सभापती पंचायत समिती** यांनीही महिला तक्रार निवारण समिती विषयी समिती स्थापन झाली आहे का विचारणा करण्यात आली

**श्री.संजय शेडगे विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** यांनी सभागृहाला माहिती दिली की समिती स्थापन करण्यात बाबत चर्चा करण्यात आली असून तालुक्यातील महिला वकील व सामाजिक कार्यकर्ता महिला यांना समिती मध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. तसेच माहे एप्रिल २०२६ प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या भेटी व अंगणवाडी कार्यरत मंजूर अंगणवाडी, अंगणवाडी सेविका मदतनीस मंजूर पदे रिक्त पदे तसेच सर्वधारण सॅम/ मॅम सर्व्हे. अहवाल बाबत माहिती सांगितली

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी नविन अंगणवाडी मंजूरी बाबत विचारणा केली तसेच अंगणवाडी दुरुस्तीचे काम लवकर व्हायला पाहिजे असे सांगितले

**श्री.संजय शेडगे विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** यांनी सांगितले की नविन अंगणवाडी ला जिल्हास्तरावरुन मंजूरी मिळते असे सांगितली

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी तालुका आरोग्य अधिकारी तालुक्यातील आरोग्य सेवेबाबत, पी.एम. कटर बाबत विचारण्यात आले.

**तालुका आरोग्य अधिकारी** डॉ.अक्षय सोलंकी यांनी पी.एम कटर बाबत जिल्हास्तरावर मागणी केलेली आहे. तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रम, प्रसुती अहवाल, साथरोग सर्वेक्षण, साथीबाबत अहवाल, क्षयरोग कुष्टरोग दुरीकरण, शालेय आरोग्य तपासणी बाबत माहिती सभागृहास सांगितली

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी भुमी अभिलेख, ग्रामिण पाणी पूरवठा जल संधारण विभाग कोलाड, यांचा आढावा घेण्यात आला असता ते मिटींग ला उपस्थित नव्हते सदर विभागाना मागिल मिटींगचे संदर्भ टाकून पत्र देण्यास सांगितले

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी जे विभाग पंचायत समिती सर्वसाधारण सभेस उपस्थित नव्हे त्याबाबत नाराजी व्यक्ति केली सदर विभाग मासिक सभेला उपस्थित नसल्याने तालुक्यातील तक्रारी चे निवारण कसे करायचे याबाबत सभागृहास सांगितले व जे विभाग मिटींला उपस्थित नव्हते याबाबत मा.जिल्हाधिकारी रायगड यांना पत्र देण्याबाबत सांगितले आहे.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी कृषी विभागाची आढावा घेतला

**कृषी अधिकारी मुरुड श्री.रविद्र कौतीक सैदांणे** यांनी कृषी विभागाच्या नवनविन योजना बाबत माहिती सभागृहास सांगितली फळबाग लागवड १२० हेक्टर पूर्ण झाले असून ८० लाभार्थ्यांना लाभ दिला यावर्षी सुध्दा १२० हेक्टर पूर्ण होणार आहे. एम.आय.डी.एस, पॉवर ट्रिलर, ट्रक्टर, यंत्र सामुग्रीचा शेतक-यांनी या योजनेचा लाभ कसा घेता येईल व एस.सी./एस.टी आणि ओबीसी संवर्गातील लोकांना या योजनेत किती अनुदान आहे. याबाबत माहिती दिली

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी कृषी विषयक योजना बाबत अजून काही नविन योजना आहे का व तालुक्यातील नागरिकांना यांचा लाभ घेता येईल का सातबारा वर नोंद पाहिजे का ? याबाबत विचारणा करण्यात आली

**श्री.वसंत दळवी, विस्तार अधिकारी (कृषि)** यांनी सांगितले की कृषी विकास अधिकारी व रायगड जिल्हा परिषद अलिबाग, यांच्या कडील जिल्हा परिषद फंड योजना सन-२०२६-२०२७ अंतर्गत तालुकास्तरीय कृषी मेळाव्याचे नियोजन

करणे बाबतचे पत्र वाचन करणेत आले मा.सभापती यांनी दिलेल्या सुचनेनुसार मा.आमदार साहेब सो. तसेच मा.सभापती महोदय, पंचायत समिती यांच्या बरोबर चर्चा करुन मेळाव्याची तारीख दि.२८ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्याबाबत टरविणेत आले सदर मेळाव्याच्या संयुक्त विदयमाने नियोजन करणेत यावे. शेतकरी यांचा सन्मान या कार्यक्रमाच्या नियोजनाने करणेत यावा जेणे करुन कृषी विभागाचा विविध योजनांचा प्रचार व प्रसार करुन शेतक-यांना त्याचा लाभ मिळेल व शेतक-यांच्या शेती उत्पन्नात वाढ होणेस उपयुक्त टरेल याबाबत सभागृहास सांगितले

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी विचारले की भात शेती पंचनाम्याचे काम पूर्ण झाले का शेतक-यांना नुकसान भरपाई कधी मिळणार आहे किती रक्कम आली आहे.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी विचारले की किती लाभ मिळतो

**कृषी अधिकारी मुरुड श्री.रविद्र कौतीक सैदांणे** यांनी सांगितले की नुकसानीचे पंचनामे झाले आहे. ग्रामसेवकांचे पंचनामे बाकी आहे. नुकसानी बाबतचे लाभ तहसिल कार्यालयामार्फत देण्यात येतात असे सांगितले

**श्री.वसंत दळवी, विस्तार अधिकारी (कृषि)** यानी सांगितले की ग्रामसेवक याबाबत सहकार्य करत नाहीत.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी विस्तार अधिकारी पंचायत यांना याबाबत ग्रामसेवक यांना संपर्क करण्याबाबत सुचना करणेत यावी असे सांगितले

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी ग्रामिण पाणी पूरवठा योजनाबाबत आढावा घेण्यात आला

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी कोर्लेई गावाच्या पाणी पूरवठयाबाबत विचारणा केली

**श्री.प्रमोद हणमंत यादव कनिष्ठ अभियंता ग्रा.पा.पू.** यांनी कोर्लेई या गावाचा पाणी पूरवठा सुरळीत पणे सुरु आहे असे मा.सभागृहास सांगितले

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी ग्रामिण रुग्णालय मुरुड आरोग्य विभागाचा आढावा घेण्यात आला.

**ग्रामिण रुग्णालय मुरुड श्री.नामदेव कोंडीबा राहिदे सहाय्यक अधिक्षक ग्रामिण रुग्णालय मुरुड** यांनी मा.गटविकास अधिकारी यांना आपली ओळख करुन दिली तसेच आरोग्य विभागामध्ये पदे रिक्त आहे याबाबत माहिती दिली.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी सहा.अभियंता बांधकाम यांना तालुक्यातील कामाबाबत विचारणा करण्यात आली

**सहाय्यक अभियंता बांधकाम अशिष मुकणे** यांनी तालुक्यातील सुरु व बंद असलेल्या कामाबाबत माहिती सांगितली

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी पशुसंवर्धन विभागाच्या योजना विषयी विचारणा केली

**डॉ.मृण्मयी योगेश शेटये सहा.आयुक्त पशुसंवर्धन ता.पशु चिकीत्सालय** यांनी मुख्यमंत्री ग्रामिण पशुधन उदयोजकता योजना ,राज्यस्तरी योजना सांगितली योजनेची नाव स्वरुप पुढील प्रमाणे सांगितले १) लाभार्थ्यांना ५ दुधाळ गाय/म्हैस व ३ वर्षाचा विमा शेड व साधन सामुग्री, २) लाभार्थ्यांना ५०+५ शेळी/मेंढी गट व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री, ३) लाभार्थ्यांना किमान २०० अंडी उत्पादन देणारे ५००० एक दिवशीय पक्षी, एक महिन्याच्या खाद्यावरील खर्च, अर्धबंदिस्त/पिंजरा/गादी पध्दती शेड व इतर साधन सामुग्री, ४) शेतकर्यांना /पशुपालकांना देशी/ सुधारित मांसल कुक्कुट ३००० ते ५००० पक्षांचे संगोपन प्रकल्पाव्दारे उघोजकता योजना बाबत माहिती सांगितली

**मा.सभापती पंचायत समिती** यांनी विचारले की नव्याने काही योजना आहेत का? व शेतक-यांना अनुदान मिळते का

**डॉ.मृण्मयी योगेश शेटये सहा.आयुक्त पशुसंवर्धन ता.पशु चिकीत्सालय** यांनी सांगितले की मा.आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य पूणे यांचे दि.२१/०४/२०२६ रोजीचे पशुपालक/ शेतक-यांना पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी विशेष मोहिम राबविणेबाबत पत्राचे वाचन केले सदर पत्रामध्ये राज्यातील १० लक्ष पशुपालकास पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्ड वाटपाचे उदिष्ट देण्यात आले असून त्यांचे जिल्हानिहाय लक्ष्यांक यापूर्वीच निश्चित करुन कळविण्यात आला आहे याबाबत राज्यास दिलेले उदिष्ट १० टक्के पूर्ण करणेसाठी आपल्या जिल्हयास दिलेले उदिष्टाचे संस्थानिहाय वाटप करुन जिल्हयातील सर्व पात्र पशुपालक/ शेतक-यांकडून अर्ज संकलित करणे आवश्यक आहे यासाठी दि.१ मे २०२६ ते ३१ मे २०२६ पर्यत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. याबाबत माहिती सभागृहास दिली.

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी N.R.L.M. विभागाची योजनांची माहिती विचारणा करण्यात आला

**तालुका अभियान व्यवस्थापक शिक्षण श्रीम.अपेक्षा सुशांत भोईर** यांनी लखपती दिदी योजनेची माहिती सांगितली की योजनेचे उदिष्टे ३४५६ आहे सदयस्थितीत ३००५ एवढे लाभार्थी झाले असून उर्वरित काम चालू असून लवकरच उदिष्ट पूर्ण होईल असे सांगितले

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी ग्रामपंचायत विभागा ची माहिती विचारण्यात आली

**श्री.प्रसाद माळी विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** यांनी तालुक्यातील ग्रामपंचायत बाबत माहिती सांगितली व दिलेल्या सुचना नुसार ग्रामसेवकांना पंचनामे करणे कामा बाबत सहकार्य करण्याबाबत सांगितले

**मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती** यांनी सामाजिक वनीकरण विभाग यांना तालुक्यातील झाडाच्या लागवडीबाबत विचारणा करण्यात आली

**सामाजिक वनीकरण विभाग श्रीम.ए.के.डफडे** यांनी सांगितले की सामाजिक वनीकरण विभागा मार्फत १२००० झाडाची लागवड करण्यात आली आहे.

**श्री.वसंत दळवी, विस्तार अधिकारी (कृषि)** यांचे मार्फत मा.सभापती पंचायत समिती चे परवानगीने उपस्थित सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सचिव तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती मुरुड जंजिरा**

**मा.सभापती**
**पंचायत समिती मुरुड जंजिरा**